रिसोड पोलीसाची अवैध जुगार, दारू अड्ड्यावर धडक कारवाई >> पान 2

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते माधव नेत्रालयाच्या नवीन वास्तूचं भूमिपूजन >> पान 3

अधिकाऱ्याकडून दिशाभूल देणारी माहिती, आमदार संतापले : आमसभेत अधिकाऱ्यांना धरले धारेवर >> पान 4


**सुविचार**
प्रत्येक क्षणात आनंद शोधा.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 227 ■ सोमवार, दि. 31 मार्च 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर गौतमी पाटीलने चाहत्यांना दिली गुड न्यूज

आतील पान



# ...तर फडणवीसांना आमचा पाठिंबा

## राज ठाकरेंनी जाहीर केली पुढील राजकारणाची दिशा

**दैनिक आपला विदर्भ**

***मुंबई/प्रतिनिधी :*** *लोकसभेत मोदींना बिनशर्त पाठिंबा देणाऱ्या राज ठाकरेंनी आता देवेंद्र फडणवीसांना पाठिंबा देण्याची भाषा केली आहे. महाराष्ट्राचे प्रश्न सोडवणार असतील, मराठी माणसाच्या चांगल्यासाठी काम करणार असतील तर फडणवीसांना पाठिंबा असेल असं राज ठाकरेंनी गुढीपाडवा मेळाव्यातून जाहीर केलं. सगळे पक्ष महापालिका निवडणुकांची तयारी करत असताना राज ठाकरेंनी हे मोठं वक्तव्य केलं आहे. तसेच भाजपच्या इतर सर्व मुद्द्यांना विरोध करत राज ठाकरेंनी देवेंद्र फडणवीसांना मात्र पाठिंबा जाहीर केल्यानं अनेकांच्या भुवयाही उंचावल्या आहेत.*

राज ठाकरे म्हणाले की, निवडणुका संपल्या, शिमगा संपला. देवेंद्र फडणवीसांच्या हाती एक सुसंस्कृत राज्य आलेलं आहे. मराठी माणसासाठी जर चांगल्या गोष्टी करणार असाल तर आमचा तुम्हाला निश्रि्चतपणे पाठिंबा आहे. पण प्रत्येक गोष्ट आमचं ऐकून करा.

**राज ठाकरेचा पाठिंबा भाजपला की महायुतीला?**

राज ठाकरेंच्या या वक्तव्याने काही प्रश्र्न देखील जन्माला घातले आहेत. राज ठाकरेंचा फक्त फडणवीसांना म्हणजेच भाजपला पाठिंबा असेल की महायुतीला? शिंदेंची शिवसेना आणि अजित पवारांची राष्ट्रवादी वगळून राज ठाकरेंचा फडणवीसांना पाठिंबा असेल? या प्रश्र्नाची उत्तर कधी मिळणार याची महाराष्ट्राला उत्सुकता असेल.

**औरंगजेबाची कबर असायला हवी**

ज्या फडणवीसांना राज ठाकरेंनी पाठिंबा जाहीर केला आहे त्या फडणवीसांच्या भाजपनं औरंगजेबाची कबर हटवण्याची भूमिका घेतली आहे. मात्र शिवरायांच्या पराक्रमाची साक्षीदार म्हणून औरंगजेबची कबर असली पाहिजे अशी भूमिका राज ठाकरेंनी जाहीर केली. जो औरंगजेब महाराष्ट्रावर चाल करून आला होता त्याला मराठ्यांनी याच मातीत गाढलं. औरंगजेबाची कबर पाहून हा इतिहास प्रत्येकाला समजेल. शिवरायांचा पराक्रम शिकवण्यासाठी शाळेच्या सहली औरंगजेबच्या कबरीजवळ नेल्या पाहिजेत असा सल्लाही त्यांनी दिला. चित्रपट पाहून जागे होणारे हिंदू काही कामाचे नाहीत असा टोला देखील राज ठाकरेंनी लगावला...

दरम्यान राज ठाकरेंनी विविध विषयांवरून विरोधकांना धारेवर धरलं. मनसे हा हरलेला पक्ष नाही असं बोलून कार्यकर्त्यांचा उत्साह वाढवला. प्रयागराजमध्ये झालेल्या गंगास्नानावरून देखील त्यांनी नदी सफाईचा मुद्द्याला पुन्हा हात घातला. गंगा सफाईवरून राज ठाकरेंनी घेतलेल्या भूमिकेवर टीका करणाऱ्यांना देखील धू-धू धुतल्याचं दिसून आलं.

दुसरीकडे, संतोष देशमुख हत्या प्रकरण, बीडमधील वाढती गुन्हेगारी आणि मराठी माणसांचे प्रश्र्न अशा अनेक विषयांवर राज ठाकरे यांनी बोट ठेवलं. तर येत्या महापालिका निवडणुकीसाठी कार्यकर्त्यांना कामाला लागण्याचे आदेश राज ठाकरेंनी दिले.

## आर्य समाजाच्या स्वार्णिम वर्षाच्या कार्यक्रमाला केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांची उपस्थिती



**दैनिक आपला विदर्भ**

**नवी मुंबई/प्रतिनिधी :** आर्य समाजाच्या स्वार्णिम वर्षाच्या कार्यक्रमाला केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांनी उपस्थिती लावून कार्यक्रमाची शोभा वाढविली.

स्वामी दयानंद सरस्वती यांच्या अमूल्य विचारावर आर्य समाजाची वाटचाल सुरु आहे. भारताच्या विकासामध्ये आर्य समाजाचं खुप मोठे योगदान आहे. आर्य समाजाशी माझे व माझ्या कुटुंबाचे नाते असून, या कार्यक्रमाला आलो याचा मला आनंद आहे.असे यावेळी केंद्रीय मंत्री पियुष गोवर यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले. कार्यक्रमाला बोरिवली विधानसभेचे आमदार संजय उपाध्याय यांची उपस्थिती होती.

## छत्रपती संभाजीनगर जिल्हाधिकारी कार्यालयावर काळी गुढी उभारुन सरकारचा निषेध




**दैनिक आपला विदर्भ**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** निवडणूक काळात संपूर्ण पीक कर्ज माफी व संपूर्ण सातबारा कोरा करण्याचे शेतकऱ्यांना दिलेले आश्वासन न पाळल्यामुळे व उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजित पवार यांनी शेतकऱ्यांविषयी केलेल्या वक्तव्याच्या निषेधार्थ आज स्वाभिमानी शेतकरी संघटनेतर्फे जिल्हाधिकारी कार्यालय छ.संभाजी नगर येथे काळी गुढी उभारून निषेध आंदोलन करण्यात आले. यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हा अध्यक्ष कृष्णा भाऊ साबळे, युवा जिल्हा अध्यक्ष माऊली मुळे, मराठवाडा संघटक दिनकर पवार, राज्य प्रवक्ते प्रा.डॉ. शिवाजी हुसे, जिल्हा सचिव यादवराव कांबळे, कन्नड तालुका अध्यक्ष रामेश्र्वर भुसारे, अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष अजिम खान आदी शेतकरी व संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# कर्जमाफी देणार नसाल तर नेत्यांना गावबंदी

## मनोज जरांगे पाटील यांचा पत्रकार परिषदेत इशारा

**दैनिक आपला विदर्भ**




**जालना/प्रतिनिधी :** कर्जमाफी देणार नसाल तर, नेत्यांना गावं बंदी मोहिम हाती घेणार असल्याचा गंभीर इशारा मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी राज्य सरकारला दिला आहे. शेतकऱ्यांनी कर्जमाफी करण्याची मागणी केली असली तरी, परिस्थिती बघून निर्णय घेऊ असे मुख्यमंत्री फडणवीस आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी स्पष्ट केल आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी इथून पुढे स्वतःचे हित पाहावे असे म्हणत जर हे संपूर्ण कर्जमुक्ती करणार नसेल तर, आंदोलन हाती घेऊन यांना गाव बंदी करू असा इशारा मनोज जरांगेंनी दिला आहे. त्याचबरोबर एमपीएससीच्या विद्यार्थ्यांसाठी ईसीबीसीतून लिंक सुरु करून देण्याचा शासन निर्णय काढला. त्यामुळे जरांगेंनी मंत्री मरलीधर मोहळ आणि आशिष शेलार यांचे आभार मानले असून, असाच आता मराठा आरक्षणाचा प्रश्र्न सोडवावा असेही जरांगे यांनी म्हंटलंय. दरम्यान, गोदावरी बंधाऱ्यात पाणी नसल्याने गोदापट्ट्यातील गावांमध्ये पाणीटंचाई निर्माण झाली असून, गोदा बंधाऱ्यात पाणी सोडावे, अशी मागणी जरांगे पाटील पत्रकार परिषदेत केली आहे.

## कर्नाटकात नक्षलींचा बिमोड करणाऱ्या डॅशिंग 'कोल्हापूरकर' आयपीएस हेमंत निबाळकरांना मुख्यमंत्री पदक

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** कोल्हापूरचे सुपूत्र कर्नाटक राज्य गुप्तचर विभागाचे संचालक आणि डॅशिंग आयपीएस अधिकारी हेमंत निंबाळकर यांना मुख्यमंत्री पदक जाहीर करण्यात आलं आहे. कर्नाटकात हेमंत निंबाळकर यांच्यासह गुप्तचर विभागातील २२ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना मुख्यमंत्री पदकाने सन्मानित करण्यात येईल. निंबाळकर १९९८ च्या बॅचचे आयपीएस अधिकारी आहेत. एका मराठी अधिकाऱ्याने कर्नाटकात ठेवलेला दबदबा नेहमीच कौतुकास्पद आणि अभिमानास्पद राहिला आहे. कर्नाटकात नक्षलींना गुडघ्यावर आणण्यात आयपीएस हेमंत निंबाळकरांचा सिंहाचा वाटा आहे.

यावर्षी जानेवारी महिन्यात चिक्कमगलुरू जिल्ह्यात सहा नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण करताना शस्त्रे खाली ठेवली होती. सहा कुख्यात नक्षलींनी आत्मसमर्पण केल्याने कर्नाटक सरकारने राबवलेल्या मोहिमेला मोठं यश आलं होतं. कर्नाटक सरकारने नक्षली चळवळीचा खात्मा करण्यासाठी नक्षल आत्मसमर्पण आणि पुनर्वसन समिती स्थापन केली होती. या समितीने सहा जहाल नक्षलींना आत्मसमर्पण करण्यास भाग पडताना मुख्य प्रवाहात येण्याची संधी दिली. नक्षली चळवळीचा खात्मा करण्यासाठी विविध पातळीवर धोरणांची अंमलबजावणी करण्यात आली होती. यामध्ये कर्नाटक गुप्तचर विभागाचे हेमंत निंबाळकर यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# साईभक्तांना मिळणार पाच लाखापर्यंत विमा संरक्षण

## गुढी पाडव्याच्या दिवशी साई संस्थानची मोठी घोषणा, नेमका कुणाला मिळणार लाभ?


**दैनिक आपला विदर्भ**

**शिर्डी/प्रतिनिधी :** शिर्डीत साईबाबांच्या दर्शनासाठी वर्षभर देशभरातून मोठ्या संख्येने भाविक येत असतात. मात्र, बऱ्याचदा दर्शन घेण्यासाठी येत असताना किंवा दर्शन घेऊन परतताना भाविकांसोबत छोट्या मोठ्या दुर्घटना घडतात. या पार्श्र्वभूमीवर साई संस्थानने मोठा निर्णय घेतला आहे. साईभक्तांना आता पाच लाखापर्यंतचे विमा संरक्षण देण्याचा निर्णय संस्थानकडून घेण्यात आला आहे.

शिर्डीत साईबाबांच्या दर्शनाला येणाऱ्या भाविकांना विमा संरक्षण देण्याचा मोठा निर्णय साई संस्थानने घेतलाय. मात्र साईभक्तांनी दर्शनाला येण्याआगोदर साई संस्थानच्या अधिकृत वेबसाईटवर आपली नोंदणी करणे बंधनकारक आहे. घरातून निघाल्यानंतर साई मंदिरात दर्शन करेपर्यंत काही अप्रिय घटना घडली तर पाच लाखांपर्यंतचे विमा संरक्षण संबंधिताला किंवा त्याच्या कुटुंबियांना मिळणार आहे.

काय म्हणाले साई संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी?

साई संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी म्हटले आहे की, जो भक्त



साईबाबांच्या दर्शनासाठी येणार आहे, त्याच्यासाठी पाच लाखांचा विमा उतरवण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे. त्यात अट अशी आहे की, जो भक्त साईबाबांच्या दर्शनासाठी येईल, त्यांनी दर्शनाला निघण्यापूर्वी साईबाबा संस्थानची ऑनलाईन वेबसाईटवर नोंदणी करणे आवश्यक आहे. यामुळे भक्त साईबाबांच्या दर्शनासाठीच येत आहे, याची ओळख पटण्यास मदत होईल. जे फक्त नोंदणी करून येतील, त्यांचा विमा उतरवला जाणार आहे. सर्व साई भक्तांना यानिमित्त मी विनंती करत आहे की, आपण निघण्यापूर्वी साईबाबा संस्थानच्या ऑनलाईन वेबसाईटवर नोंदणी करावी, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

साई मंदिराच्या सुवर्ण कळसावर उभारली गुढी

दरम्यान, साईबाबांच्या शिर्डीतही गुढीपाडवा अर्थात मराठी नववर्षाचा उत्साह दिसून आला. साई मंदिराच्या सुवर्ण कळसावर पारंपारिक पद्धतीने गुढी उभारण्यात आलीये. साई संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी सपत्नीक विधिवत पूजा करून ही गुढी उभारली. आज मराठी नववर्षाचे स्वागतही मोठ्या उत्साहात पार पडत असून साई भक्तांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केलीये. आज साईबाबांच्या मूर्तीला कोट्यवधी रूपयांच्या आभूषणांसह साखरेच्या गाठीची माळ परिधान करण्यात आलीये. तर साई मंदिर आकर्षक फुलांनी सजले आहे.

# पोलीस कर्मचाऱ्याची हत्या; तीन संशयीत पोलीसांचा ताब्यात

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलडाणा /प्रतिनिधी :** देऊळगाव राजामध्ये एका पोलीस कर्मचाऱ्याची हत्या केल्याची खळबळ जनक घटना ३० मार्च रोजी उघड झाली आहे. पोलिसांनी तीन संशयितांना ताब्यात घेतले आहे. कर्मचाऱ्याची हत्या नेमकी कशामळे झाली, याचा तपास पोलिसांकडून सुरु करण्यात आला आहे. कर्मचाऱ्याच्या हत्येमुळे पोलीस वर्तुळात खळबळ उडाली आहे.

**जिल्ह्यातील खळबळजनक घटना**

मिळालेल्या माहितीनुसार, बुलढाण्यातील देऊळगाव राजा ते सिंदखेड राजा मार्गावरील गिरोली खुर्द शिवारात ज्ञानेश्र्वर म्हस्के या पोलीस कर्मचाऱ्याचा त्याच्याच गाडीत गळा आवळून खून झाल्याची माहिती पोलिसांना मिळाली सदर माहिती मिळतात पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला असता पोलिसांनी प्राथमिक दर्शनी केलेल्या तपासात गडावर खून झाल्याचे सिद्ध





झाले आहे. पोलिसांनी घटनास्थळी डॉग स्कॉड, फिंगर प्रिंट पथक, गुन्हे शाखेने जाऊन पंचनामा केला. त्या दिशेने तपास सुरू केला आहे.या प्रकरणी तीन संशयित ताब्यात घेतले आहेत. त्यांच्याकडून ही हत्येचा काही उलगडा होऊ शकतो का, या दुष्टीने सुद्धा पोलिस तपास करत आहेत. म्हस्के यांचा मृतदेह त्याच्याच गाडीत आढळला आहे. गाडी लिंबाच्या झाडाला लावून दिली होती. कर्मचाऱ्याची हत्या नेमकी कशामळे झाली, याचा तपास पोलिसांकडून सुरु करण्यात आला आहे. कर्मचाऱ्याच्या हत्येमुळे पोलीस वर्तुळात खळबळ उडाली आहे. पुढील तपास पोलीस करीत आहेत

## ट्रॅजेडी क्वीन मीना कुमारी

हिंदी चित्रपट सृष्टीतील ट्रॅजेडी क्वीन मीना कुमारी यांचा आज स्मृतिदिन. मीना कुमारी यांचा जन्म १ ऑगस्ट १९३२ रोजी एका सुन्नी मुस्लिम कुटुंबात झाला. त्यांचे मूळ नाव मेहजबिन असे होते. कलेचा वारसा त्यांना कुटुंबातूनच मिळाला. त्यांचे वडील अली बक्ष हे चित्रपट आणि पारशी रंगभूमीवरील कलाकार होते. आई इकबाल बानू या प्रसिद्ध नृत्यांगना होत्या. कामिनी या नावाने त्या अभिनयही करत. मीना कुमारी या चार वर्षाच्या असतानाच त्यांनी अभिनय क्षेत्रात पाऊल ठेवले. लेदर फेस नावाच्या चित्रपटात त्यांनी बाल कलाकार म्हणून काम केले. त्यांनी जवळपास २० चित्रपटात बाल कलाकार म्हणून काम केले. वयाच्या १४ व्या वर्षी बच्चो का खेल या चित्रपटात त्यांनी नायिका म्हणून भूमिका केली. त्या काळात नर्गिस, नूतन, निम्मी या आघाडीच्या अभिनेत्री चित्रपट सृष्टीवर अधिराज्य गाजवत होत्या. मीना कुमारी यांनीही दमदार अभिनयाद्वारे त्यांच्यात स्थान मिळवले आणि लवकरच त्याही आघाडीच्या अभिनेत्री बनल्या. कमाल अमरोही दिग्दर्शित महल हा त्यांचा चित्रपट खूप गाजला. पुढे कमाल अमारोही यांनी मीना कुमारी यांना घेऊन अनारकली नावाचा चित्रपट बनवण्याची घोषणा केली . या चित्रपटाचे शूटिंग सुरू असतानाच मीना कुमारी यांना अपघात झाला त्यात त्यांच्या डाव्या हाताला दुखापत झाली. यावेळी कमाल अमारोही त्यांना नियमित भेटायला येत त्यातूनच त्यांचे प्रेम जमले. आर्थिक अडचणीमुळे हा चित्रपट पूर्ण होऊ शकला नाही मात्र दोघांमधील प्रेम वाढत गेले. कमाल अमारोही मीना कुमारी यांना मंजू म्हणत तर मीना कुमारी कमाल अमारोही यांना चंदन नावाने संबोधत असे. दोघांनी लग्न करण्याचा निर्णय घेतला तरी घरच्यांच्या संमती शिवाय लग्न करण्यास मीना कुमारी तयार नव्हत्या. मात्र कमाल अमारोही यांनी खुप आग्रह केल्याने त्यांनी लग्न केले. त्यांच्या लग्नाची बातमी त्यांच्या वडिलांना समजल्यावर ते खूप संतापले. त्यांनी दोघांच्या भेटीवर बंधने आणली. कमाल अमारोही यांनी मीना कुमारी यांना घेऊन डेरा नावाचा चित्रपट काढण्याची घोषणा केल्यावर वडील अली बक्ष यांनी मेहबूब यांच्या अमर नावाच्या चित्रपटात काम करण्यासाठी मीना कुमारी यांच्यावर दबाव आणला. चार पाच दिवसांचे शूटिंग झाल्यावर त्यांनी तो चित्रपट सोडला व थेट आपल्या नवऱ्याकडे म्हणजे कमाल अमारोही यांच्याकडे गेल्या. कमाल अमारोही यांचे पहिले लग्न झाले होते व त्यांना पहिल्या पत्नीपासून तीन अपत्येही होते. त्यामुळे मीना कुमारी यांची तीव्र इच्छा असतानाही मीना कुमारी यांना मूल होऊ न देण्याचा निर्णय त्यांच्याकडून तिच्यावर लादला गेला. मीना कुमारी यांच्या कौटुंबिक जीवनात इतकी उलथापालथ होत असताना त्यांचे चित्रपट मात्र यशस्वी होत होते. एक ही रास्ता, दिल अपना प्रीत पराई, दायरा, परिणिता, दिल एक मंदिर, शारदा, साहब बीबी और गुलाम, फुल और पथर हे त्यांनी अभिनय केलेले उल्लेखनीय चित्रपट. मीना कुमारी या फिल्म फेअर पुरस्कार मिळवलेल्या पहिल्या अभिनेत्री आहेत . १९५३ साली त्यांना बैजू बावरा साठी तर पुढील वर्षी म्हणजे १९५४ साली परिणितासाठी देखील फिल्मफेअरचा पुरस्कार मिळाला. साहब बीबी और गुलाम तसेच काजल या चित्रपटातील भूमिकांसाठीही त्यांना फिल्मफेअरचा पुरस्कार मिळाला आहे. मीना कुमारी या जितक्या चांगल्या अभिनेत्री होत्या तितक्याच चांगल्या कवियत्री देखील होत्या. नाझ या नावाने त्यांच्या काही उर्दू रचना प्रकाशित झाल्या आहेत. त्यांचा आवाजही गोड होत्या. मधुबाला यांना त्यांचा आवाज खुप आवडायचा. त्यांच्या यशाचा आलेख जसा उंचावत गेला तसा कमाल अमरोही यांचा हेवा वाढत गेला. मीना कुमारी यांनी अभिनय सोडून द्यावा यासाठी ते दबाव आणू लागले. मीना कुमारी यांनी अभिनय सोडण्यास नकार दिल्याने दोघांतील तणाव वाढत गेला. पुढे दोघे विभक्त झाले. त्यानंतर धर्मेंद्र यांच्याशी त्यांचे संबंध असल्याचीही चर्चा होती. ते दोघेही एकमेकांच्या प्रेमात बुडाल्याचे अनेक दाखले जुन्या चित्रपट मॅगझीन मधून मिळतात. फुल और पत्थर या चित्रपटानंतर धर्मेंद्र यांनीही त्यांच्यापासून अंतर ठेवण्यास सुरवात केल्यावर त्या व्यथित झाल्या. त्यांची प्रकृती खालावली. डॉक्टरांनी त्यांना रोज एक पेग ब्रँडी घेण्याची सूचना केली. पण एक पेगचे दोन पेग, दोनचे चार पेग असे पेग वाढत गेले. औषध म्हणून सुरू केलेली ब्रँडी लवकरच व्यसनात रूपांतरित झाली. त्या नशेच्या आहारी गेल्या. शूटिंगच्यावेळी, प्रवासात त्यांच्या पर्स मध्ये ब्रँडीची बाटली असायची. साहब बीबी और गुलाम तसेच छोटी बहू या चित्रपटातील भुमीका आपल्या वास्तव जीवनाशी साधर्म्य दाखवणाऱ्या आहेत असे त्या म्हणत. नशेच्या आहारी गेल्याने त्यांची प्रकृती खालावत गेली त्यातच त्यांचे निधन झाले. पडद्यावरील आणि वास्तव जीवनातील साधर्म्य असणाऱ्या ट्रॅजेडी क्वीन ३१ मार्च १९७२ रोजी काळाच्या पडद्याआड गेल्या. ट्रॅजेडी क्वीन मीना कुमारी यांना भावपूर्ण आदरांजली.

# रिसोड पोलीसाची अवैध जुगार, दारु अड्ड्यावर धडक कारवाई

## १,७५,७२०/- रू. चा मुद्देमाल जप्त

**दैनिक आपला विदर्भ**

**रिसोड/प्रतिनिधी :** रिसोड शहरातील विविध ठिकाणी धाड टाकून दिनांक २९ मार्च रोजी संध्याकाळच्या दरम्यान रिसोड पोलिसांच्या डी बी पथकाने कारवाई केली. याबाबत रिसोड पोलीस स्टेशनकडून मिळालेल्या पोलीस स्टेशनच्या डी.बी. पथकाला मिळालेल्या गुप्त माहितीवरून पोलीस स्टेशन रिसोडचे ठाणेदार रामेश्रृवर चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली सेनगाव रोडवरील कोठूळे यांच्या फुटाण्याच्या फॅक्टरीसमोर मोकळया जागेत तिन पत्ती नावाचा ५२ ताशपत्त्यांचा जुगारावर धाड टाकण्यात आली.

सदर कार्यवाहीमध्ये अक्षय रमेश आडे, वय ३१ वर्षे याची अंगझडती घेतली असता त्याचे ताब्यात नगदी २४०० मोबाईल १०,००० भारत भिमा पवार, वय ३१ वर्षे याची अंगझडती घेतली असता त्याचे ताब्यात नगदी १७००/- रू. व मोबाईल किं.अं. १०,०००/- रू. ज्ञानेश्रृवर आयाजी फुफाटे वय ३४ वर्षे याची अंगझडती घेतली असता त्याचे ताब्यात नगदी २१००/- रू. दशरथ धोंडूजी उगले, वय ४२ वर्षे याची अंगझडती घेतली असता त्याचे ताब्यात नगदी १२००/- रू. व एक मोबाईल किं.अं. १०,०००/- रू गजानन केशवराव सरनाईक वय ४५ वर्षे याची अंगझडती घेतली असता त्याचे ताब्यात नगदी १४००/- रू व मोबाईल किं.अं. १०,०००/- रु., तिन पत्ती पैशाची हार जित खेळत असलेल्या डावा मध्ये एकुण ७२०/- रूपये व ५२ ताशपत्ते, तसेच घटनास्थळावरून इसम नामे अक्षय रमेश आडे. वय ३१ वर्षे यांचे मालकीची लाल रंगाची होण्डा लिओ कंपनीची मोटार सायकल क. एमएच २९ बीएन २३८१ किं.अं. ५०,०००/- रू. व घटनास्थळावरून पळून गेलेल्या आरोपींची एक




काळया रंगाची होण्डा ड्रीम युगा कंपनीची मोटार सायकल क. एम.एच.३७एक्स०२८५ किं. अं. ४०,०००/- रू. व एक काळया रंगाची प्लॅटीना बजाज कंपनीची मोटार सायकल क. एम.एच.३७यु०५३३ किं.अं. ३०,०००/- रू. असा एकूण १,६९,५२०/- रू. किंमतीचा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त करून महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला.तसेच मनोज कचरू लोंढे, वय ४२ वर्षे, रा.रामनगर, रिसोड, ता. रिसोड, जि.वाशिम हा सदानंद टॉकीज जवळ, वरली मटका नावाचा जुगार अवैधरित्या खेळून लोकांकडून पैशाची हार-जित करतांना मिळून आल्याने त्याचे ताब्यातून नगदी १५००/- रू., वरली मटक्याचे आकडे लिहिलेली चिठ्ठी, एक मोबाईल किं.अं. ४,०००/- रू. असा एकूण ५,५००/- रू. चा वरली जुगाराचा मुद्देमाल जप्त करून गुन्हा नोंद करण्यात आला. दिनकर दत्तात्रय चोपडे, वय ४२ वर्ष, रा. सोनार गल्ली, रिसोड, ता. रिसोड जि. वाशिम हा बस स्टॅण्ड समोर अवैधरित्या देशी दारूची विक्री करतांना मिळून आल्याने त्याचे ताब्यातून देशी दारू भिंगरी संत्रा कंपनीचे सिलबंद १० नग एकूण किं. ७००/- रू. किंमतीचा मुद्देमाल जप्त करून महाराष्ट्र दारूबंदी कायद्यांतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला.सदरची कामगिरी मा. पोलीस अधीक्षक अनुज तारे,अपर पोलीस अधीक्षक लता फड, सहायक पोलीस अधीक्षक, वाशिम नवदीप अग्रवाल यांचे मार्गदर्शनाखाली व पोलीस निरीक्षक रामेश्रृवर चव्हाण यांचे नेतृत्वाखाली डी. बी. पथकाचे पोलीस उपनिरीक्षक सचिन गोखले, पोलीस उपनिरीक्षक रामेश्रृवर नागरे, पोलीस हवालदार श्रीकिसन नागरे, पोलीस नाईक रतन बावस्कर, पोलीस अंमलदार रवि अढागळे, विनोद घनवट, परमेश्वर भोणे, सुनिल इंगळे, विश्वास चव्हाण यांनी केली आहे.

# पतीचे तुकडे करणाऱ्या मुस्कानबरोबर यूपी पोलीसाचा डान्स? व्हिडीओ अपलोड करणाऱ्याविरोधात गुन्हा दाखल

मेरठ : उत्तर प्रदेशच्या मेरठ येथे काही दिवसांपूर्वी पत्नीने प्रियकराच्या मदतीने तिच्या पतीची हत्या केल्याचे प्रकरण उघडकीस आले आहे. या प्रकरणातील आरोपी सध्या तुरूंगात आहेत. यादरम्यान एका इंस्टाग्राम वापरकर्त्याने तुरूंगात असलेल्या या आरोपी महिलेबरोबर गणवेशातील पोलिस निरीक्षक नाचतानाचा व्हिडीओ पोस्ट केला होता. एआय वापरून तयार केलेला व्हिडिओ अपलोड केल्यानंतर या प्रकरणी मेरठ पोलिसांनी या इन्स्टाग्राम वापरकर्त्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

हा व्हिडीओ फेसबूक, यूट्यूब आणि इंस्टाग्राम यासारख्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरती मोठ्या प्रमाणात शेअर केला जात आहे. या व्हिडीओमध्ये पती सौरभ राजपूत याची तिच्या बॉयफ्रेंडच्या मदतीने हत्या करणारी आरोपी मुस्कान रस्तोगी (२६) हिला दाखवण्यात आले होते.

मेरठ (शहर)चे एसपी आयुष विक्रम सिंह यांनी सांगितले की, व्हिडीओ एआय वापरून बनवण्यात आला होता



आणि पोलिसांनी ही व्हिडीओ सोशम मीडियावर अपलोड केला गेला त्या आयडीचा शोध घेतला. उर निरीक्षक कर्मवीर यांनी दिलेल्या तक्रारीनंतर या प्रकरणात शनिवारी संध्याकाळी ब्रम्हपुरी पोलीस ठाण्यात एफआयआर दाखल करण्यात आला आहे.

''इंस्टाग्राम आयडी प्रियांशु रॉक्स या नावाने रजिस्टर केलेली आहे, ज्याच्यावर माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६६ (कॉम्प्युटरशी संबंधित गुन्हे) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच या प्रकरणाची चौकशी मेरठ पोलिसांच्या सायबर सेलकडे सोपवण्यात आली आहे,'' असे विक्रम सिंह यांनी सांगितले.

हा व्हिडीओ वाईट उद्देशाने अपलोड करण्यात आला आहे आणि यामुळे यूपी पोलिसांच्या प्रतिष्ठेला धक्का पोहचू शकतो. म्हणून आम्ही अशा कृत्यासाठी जबाबदार असलेल्यांविरोधात कायदेशीर कारवाई करण्याचा निर्णय घेतला आहे, असेही सिंह यांनी सांगितले.

दरम्यान सौरभ राजपूतच्या हत्येप्रकरणी मुस्कान रस्तोगी आणि साहिल शुक्ला हे आता मेरठमधील चौधरी चरण सिंग तुरूंगात आहेत. त्यांच्यावर ३ मार्चच्या रात्री ब्रह्मपुरी परिसरातील तिच्या भाड्याच्या अपार्टमेंटमध्ये सौरभ शुक्ला याची हत्या करून त्याचे शरीराचे तुकडे केल्याचा आरोप आहे. नंतर पोलिसांनी त्याच्या शरीराचे तुकडे सिमेंटच्या ड्रममधून जप्त केले होते. या प्रकरणी या दोघांना १९ मार्च रोजी अटक करण्यात आळी आहे.

दरम्यान हत्या झालेल्या सौरभच्या कुटुंबियांनी उत्तर प्रदेश मुख्यमंर्त्यांच्या पोर्टलवर तक्रार दाखल केली असून त्यांनी आरोप केला आहे की मेरठ तुरुंग प्रशासन पक्षपाती आहे आणि तुरुंगात त्याच्या मारेकऱ्यांना संरक्षण देत आहे. तसेच त्यांनी दोन्ही आरोपींनी पूर्वेकडील तुरुंगात हलवण्याची मागणी केली आहे.

## व्लादिमीर पुतिन यांच्या ताफ्यातील आलिशान कारमध्ये मोठा स्फोट!

मास्को : रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्या यांच्या ताफ्यातील एका लक्झरी लिमोझीन (त्म्स्दल्ेहा) कारमध्ये मॉस्को येथे भीषण स्फोट झाल्याचा प्रकार समोर आला आहे. द सनने यासंबंधीचे वृत्त दिले आहे. या घटनेमुळे पुतिन यांच्या सुरक्षेबाबात चिंता व्यक्त केल्या जात आहेत. तसेच पुतिन यांच्या जिविताला रशियाच्या राजधानीतही धोका असल्याचे समोर आले आहे.

दरम्यान ही कार जळून खाक होत असतानाचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांनी पुतिन यांच्या आजारपणाच्या चर्चादरम्यान रशियाला युद्धाच्या पार्श्वभूमीवर निर्णायक धक्का बसू शकतो असे विधान केले होते त्यानंतर काही दिवसांतच हा स्फोट झाला आहे.

रशियाबरोबर सुरू असलेल्या युद्धादरम्यान झेलेन्स्की यांनी काही दिवसांपूर्वी एक खळबळजनक दावा केला होता. ''व्लादिमीर पुतिन यांचा लवकरच मृत्यू होईल,'' असं विधान झेलेन्स्की यांनी केले होते. त्यानंतर झालेल्या या स्फोटाने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.

दरम्यान लुब्यांका येथेल एफएसबी मुख्यालयाजवळ ही ऑरस सेनट कार जिची किंमत २ लाख ७५ हजार पौंड सांगितली जाते, ती जळताना आढळून आली. सुरूवातीला या गाडीच्या इंजिनमध्ये आग लागली आणि ती नंतर संपूर्ण कारमध्ये पसरली असे घटनास्थळी उपस्थित असलेल्या नागरिकांनी सांगितले. अग्निशमन दलाचे जवान येण्यापूर्वीच घटनेच्या वेळी जवळच्या रेस्टॉरंट्समधील लोक मदतीसाठी धावले, असे रिपोर्टमध्ये सांगण्यात आले आहे.


दरम्यान घटनेच्या व्हिडीओमध्ये कारमधून काळा धूर बाहेर पडताना दिसत आहे. तसेच कारला झालेले नुकसान देखील दिसून येत आहे. द सनने दिलेल्या माहितीनुसार, या स्फोटाचे नेमके कारण अद्याप समोर आलेले नाही तसेच या घटनेत कोणालाही इजा झाल्याचे वृत्त समोर आलेले नाही.

# पंतप्रधान नरेंद्र मोदींनी महाराष्ट्रात उभारली 'समतेची गुढी'

## पंतप्रधानांनी स्मृतीस्थळ अन् दीक्षाभूमीवर लिहिला 'हा' अभिप्राय

**दैनिक आपला विदर्भ**

**नागपूर/प्रतिनिधी :** गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज नागपुरातून प्रवाहित होणाऱ्या दोन भिन्न विचारधारांच्या श्रद्धास्थळांना भेट दिली आहे. या माध्यमातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशात समतेची गुढी उभारली आहे. पाच तासांच्या त्यांच्या नागपूर दौऱ्याची सुरुवात ही राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्मृती मंदिरास भेट देऊन झाली. त्यानंतर पंतप्रधान थेट दीक्षाभूमी इथं दाखल झाले. दीक्षाभूमीवर जात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केलं. त्यामुळे अगोदर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुख्यालयात जाऊन स्मृती मंदिरात अभिवादन केलं. त्यानंतर दीक्षाभूमीवर बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन केलं. पंतप्रधानांच्या या कृतीनं समतेची गुढी उभारल्याचं चित्र पाहायला मिळालं.





दोनदा दीक्षाभूमीत जाणारे पहिले पंतप्रधान : पंतप्रधानांचा नागपूर दौरा अनेक अर्थांनी खास ठरलेला आहे. पंतप्रधान झाल्यानंतर तब्बल ११ वर्षानंतर ते आज गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर संघाच्या स्मृती मंदिरात गेले. तर पंतप्रधान पदी विराजमान असताना दोनदा दीक्षाभूमीत जाणारे ते पहिले पंतप्रधान ठरले आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी वारंवार यायला पाहिजे : ''आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दीक्षाभूमीला दुसऱ्यांदा भेट दिली. चांगला संदेश त्यांनी जनतेला दिला. ही भूमी अतिशय प्रवित्र आहे. पहिली संघ भूमी आणि दुसरी दीक्षाभूमी अजून माझा आपला विचार वाढवत असताना इतरांचा विचार देखील वाढला पाहिजे, त्यांचा आदर झाला पाहिजे, या हेतूनं दुसऱ्यांदा आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी वारंवार यायला पाहिजे. आपले विचार वाढवत असताना दुसऱ्यांचा देखील आदर करावा, जे बाबासाहेबांनी संविधानात लिहिलेलं आहे, त्याच पद्धतीनं बाबासाहेबांनी जो संदेश दिला आहे, त्याच पद्धतीचा संदेश त्यांनी दिलेला आहे. त्यांनी बाबासाहेबांना अभिवादन केलं, बाबासाहेबांबाबत त्यांनी अभिप्राय दिलाय, असं दीक्षाभूमीचे सचिव राजेंद्र गवई यांनी सांगितलं.

स्मृति मंदिरात पंतप्रधानांनी लिहिलेला अभिप्राय : ''परम पूजनीय डॉ. हेडगेवार जी और पूज्य गुरुजी को शत् शत् नमन । उनकी स्मृतियों को संजोते, इस स्मृति मंदिर में आकर अभिभूत हूं। भारतीय संस्कृति, राष्ट्रवाद और संगठन शक्ति के मूल्यों को समर्पित यह स्थली हमें राष्ट्र की सेवा में आगे बत्रढने की प्रेरणा देती है। संघ के इन दो मजबूत स्तंभी की यह स्थली देश की सेवा में समर्पित लाखों स्वयंसेवकों के लिए उर्जा पुंज है।

दीक्षाभूमीत व्यक्त केलेल्या भावना : बाबासाहेब अंबेडकर के पंचतीर्थों में से एक नागपुर स्थित दीक्षाभूमि में आने का सौभाग्य पाकर अभिभूत हैं। इस पवित्र स्थल के वातावरण में बाबासाहेब के सामाजिक सुमसरता, समानता और न्याय के सिद्धांतो का सहज अनुभव होता है। दीक्षाभूमि हमें गरीबों, वंचितो और जरूरतमंदो के लिए समान अधिकार और न्याय की व्यवस्था के साथ आगे बढने की ऊर्जा प्रदान करता है। मुझे पूर्ण विश्वास है कि इस अमृत कालखंड में हम बाबा साहेब अंबेडकर की शिक्षाओं और मूल्यों पर चलते हुए. देश को प्रगति के नए शिखर पर लेकर जाएंगे। एक विकसित और समावेशी भारत का निर्माण ही बाबासाहेब को हमारी सच्ची श्रद्धांजलि होगी।

नरेन्द्र मोदी
प्रधानमंत्री, भारत सरकार''

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते माधव नेत्रालयाच्या नवीन वास्तूचं भूमिपूजन

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत माधव नेत्रालयाच्या नवीन वास्तूचा भूमिपूजन सोहळा संपन्न झालाय. कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, सरसंघचालक मोहन भागवत, स्वामी अवधेशानंद गिरी महाराज, स्वामी गोविंदगिरी महाराज उपस्थित होते.**

चिरपरिचित अंदाजात भाषणाला सुरुवात : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भाषणाची सुरुवात गुढीपाडव्याच्या मराठीतून शुभेच्छा देत केली. आज चैत्र शुक्ल प्रतिपदेचा शुभ दिवस विशेष आहे. आजपासून नवरात्रीचा पर्व सुरू होतोय.

माधव नेत्रालयची अनेक दशकांची सेवा : संघ सेवेच्या पवित्र दिवशी पुण्य संकल्पचे साक्षी होतोय. माधव नेत्रालयाच्या कुल गीतेत आपण ऐकलं अध्यात्म, ज्ञान, गौरव आणि गुरुत्वाचे हे अद्भुत विद्यालय आहे. मानवता सेवा मंदिराच्या कणाकणात देवालय आहे. माधव नेत्रालय ही एक अशी संस्था आहे, जी गुरुजींच्या आदर्शावर लाखो लोकांची सेवा करते. लोकांच्या जीवनात प्रकाश परतलेला आहे. आज त्याच्या विस्तार होतोय, त्यामुळं या सेवा कार्याला गती मिळणार आहे. हजारो लोकांच्या जीवनात प्रकाश परत येणार आहे. जीवनातील अंधकार दूर होईल या सेवा कार्यासाठी माधव नेत्रालयाचे जुळलेल्या सर्व लोकांची प्रशंसा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलीय.

आरोग्य सेवीची गुणवत्ता सुधारलीय : लाल किल्ल्यावरून मी सर्वांच्या प्रयत्नांची एक अपेक्षा व्यक्त केली होती. आरोग्याच्या क्षेत्रामध्ये ज्या पद्धतीनं काम करतो आहे, त्यामध्ये माधव नेत्रालय मोठे योगदान देत आहे. देशाच्या सर्वचं नागरिकांना उत्तम आरोग्य सुविधा मिळावी ही आमची प्राथमिकता आहे. देशात गरिबातील गरिबांनाही चांगल्यात चांगला उपचार मिळावा. कोणीही देशवासी जीवन जगण्याच्या गरजेतून वंचित राहू नये, ज्या ज्येष्ठ नागरिकांनी जीवन देशासाठी समर्पित केले आहे, त्यांना उपचाराची चिंता आता सतावणार नाही. कारण सरकारचे धोरण आहे, आयुष्यमान भारत योजनेमुळं कोट्यवधी लोकांना उपचार मिळताहेत. हजारो जन-औषधी केंद्र देशातील गरिबांना मध्यमवर्गीय कुटुंबांना स्वस्त औषध उपलब्ध करून देत आहेत.

मातृभाषेत वैद्यकीय शिक्षण : देशभरात १ हजार डायलिसिस सेंटर आहे, जे नि:शुल्क सेवा देत आहेत. त्यामुळं देशवासीयांचे हजारो कोटी रुपये वाचत आहेत. गेल्या १० वर्षात गावामध्ये आयुष्यमानधारकांसाठी मंदिर तयार केले आहे. ज्यातून लोकांना देशात सर्वश्रेष्ठ डॉक्टरांकडून टेलीमेडिसिन उपलब्ध होतोय. प्राथमिक उपचार मिळतोय. त्यामुळं पुढील उपचारासाठीची सोय उपलब्ध होत आहे. उपचारासाठी हजारो किलोमीटर जाण्याची गरज आता भासत नाही. एम्स यांसारख्या संस्था तिप्पट प्रमाणात वाढवण्यात आल्या आहेत. देशात मेडिकलच्या सीट्स दुपटीने झाल्यात. आमचा प्रयत्न हाच आहे, येणाऱ्या काळात लोकांच्या सेवेसाठी जास्तीत जास्त आणि चांगले डॉक्टर उपलब्ध व्हावे. देशातले गरिबांचा मुलगाही डॉक्टर बनू शकतो, त्याचं स्वप्न ही पूर्ण होऊ शकतं. यासाठी विद्यार्थ्यांसाठी आपल्या मातृभाषेमध्ये वैद्यकीय शिक्षण उपलब्ध करून दिलं आहे. त्यामुळं येत्या काळात डॉक्टरांची मोठी फौज देशात उभी राहील, असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

## संघाचे १०० वर्ष देशसेवेला समर्पित




संस्कृतीचा विस्तार आवश्यक : आपली योग साधना आणि आयुर्वेद यालाही संपूर्ण जगभरात नवी ओळख मिळाली आहे. भारताचा सन्मान वाढतोय. कोणत्याही देशाचं अस्तित्व हे संस्कृतीचा विस्तारावर अवलंबून आहे.

संतांना केलं स्मरण : गुरुनानक देव कबीरदास तुलसीदास, सूरदास, महाराष्ट्रातील संत एकनाथ संत नामदेव, संत ज्ञानेश्वर, तुकाराम सारख्या या कित्येक संतांनी राष्ट्रीय चेतना आपल्या मौलिक विचारांनी प्राण फुंकले. स्वामी विवेकानंद यांच्यासारखे महान संत देखील झाले निराशेच्या गर्तेत गेलेल्या समाजाला बाहेर काढलं.

संघाचे वटवृक्ष झाले : राष्ट्रीय चेतनाच्या संवर्धन आणि संरक्षणासाठी जे विचार बीज १०० वर्षापूर्वी पेरण्यात आले होते, ते आज वटवृक्ष झाले आहे. सिद्धांत आणि आदर्श या वटवृक्षाला उंची प्रदान करत आहेत. लाखो-कोट्यवधी स्वयंसेवक हे त्याच्या फांद्या आहेत. हे साधारण वटवृक्ष नाही तर राष्ट्रीय स्वयंसेवक संघ भारताच्या अमर संस्कृतीचा आधुनिक अक्षयवृक्ष आहे.

## गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर गौतमी पाटीलने चाहत्यांना दिली गुड न्यूज

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** आपल्या अदांनी आणि गाण्यांनी चाहत्यांना भुरळ पाडणाऱ्या गौतमी पाटील एक गुड न्यूज घेऊन चाहत्यांसमोर आली आहे. तिने यासंदर्भात सोशल मीडियावर पोस्ट शेअर केली आहे. आज गुढीपाडवा. साडे तीन मुहूर्तापैकी एक. या शुभ दिनी गौतमी पाटीलने प्रेक्षकांना एक चांगली बातमी दिली आहे. गौतमीने सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टमधील पोस्टर पाहून चाहत्यांनीही आनंद व्यक्त केला आहे.

गुढीपाडवा आणि नवीन वर्षाच्या शुभ मुहूर्तावर गौतमी पाटीलने साईरत्न एंटरटेनमेंट प्रस्तुत 'कृष्ण मुरारी' या गाण्याचे पोस्टर नुकतेच सोशल मीडियावर शेअर केले आहे. या गाण्याचे निर्माते संदेश गाडेकर आणि सुरेश गाडेकर हे आहेत. गायिका गायत्री शेलार हिने हे गाणं गायलं असून विशाल शेलार यांनी या गाण्याचे बोल लिहिले आहेत. मनीष महाजन या गाण्याचे दिग्दर्शक आहे. तर या गाण्याचे संगीत आयोजन आदित्य पाटेकर व करण वावरे यांनी केले आहे. या गाण्याची उत्सुकता गौतमीच्या सर्व चाहत्यांना लागली आहे.

गौतमी पाटीलने तिच्या पहिल्या गवळण गीताविषयी सोशल मीडियावर पोस्ट शेअर केली आहे. याबाबत ती म्हणते, लोकसंगीतातील गवळण हा नृत्यप्रकार मला फार आवडतो. माझी खूप दिवसांपासून गवळण करण्याची इच्छा होती. साईरत्न एंटरटेनमेंट प्रस्तुत कृष्ण मुरारी या गाण्यामुळे माझी इच्छापूर्ती झाली. मी सोशल मीडियावर या गाण्याच पोस्टर नुकतच शेअर केल आहे. प्रेक्षकांचा या गाण्याच्या पोस्टरला प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. या गाण्याचा टीज़र ३ एप्रिलला प्रदर्शित होईल.

## लग्नात नाचताना धक्का लागल्यानं तरुणाची हत्या, दोन विधिसंघर्षग्रस्त बालकांची बालसुधारगृहात रवानगी

**ठाणे/प्रतिनिधी :** दोन विधिसंघर्षग्रस्त बालकांनी गावातील चालकाचा हत्या करून त्याचा मृतदेह नदी पात्रात फेकल्याची घटना समोर आली. ही घटना शहापूर तालुक्यातील काजगाव हद्दीत घडली आहे. याप्रकरणी शहापूर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेप्रमाणं खुनाचा गुन्हा दाखल करून दोन १७ वर्षीय विधिसंघर्षग्रस्त बालकांना ताब्यात घेतलं आहे. बाळू वाघ ( वय २१ रा काजगाव शहापूर) असे हत्या झालेल्या तरुणाचं नाव असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र ठाकूर यांनी दिली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार मृतक बाळू वाघ हा शहापूर तालुक्यातील काजगावमध्ये कुटुंबासह राहत होता. उदर्निवाहासाठी याच गावात ट्रॅक्टर चालक म्हणून कार्यरत होता. तर पोलिसांनी ताब्यात घेतलेले दोन्ही १७ वर्षीय विधिसंघर्षग्रस्त बालकही याच गावात राहतात. २५ मार्च रोजी शहापूर तालुक्यातील काजगाव हद्दीत लग्न होतं. याच लग्नात बाळू हा नाचत असताना त्याचा धक्का १७ वर्षीय विधिसंघर्षग्रस्त बालकाला लागला. यावरून दोघांमध्ये वाद झाला. त्यानंतर दोन १७ वर्षीय विधिसंघर्षग्रस्त बालकांनी निर्जनस्थळी गाठून बाळूवर चाकूनं वार केले. त्याचा मृतदेह भातसा नदी पात्रात मृतदेह फेकून दिला. कोणालाही संशय येऊ नये, म्हणून घटनास्थळावरून पळून गेले.


# हरभऱ्याच्या आयात शुल्कामुळे व्यापाऱ्यांमध्ये निराशा! पण शेतकऱ्यांना होणार मोठा फायदा

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** येत्या १ एप्रिलपासून हरभऱ्याच्या आयातीवर सरकारने पुन्हा एकदा करारोपण करण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी अर्थ मंत्रालयाच्या महसूल विभागाने अधिसूचना प्रसिद्ध केली आहे. सरकारने १०म आयात शुल्क लावण्याचे ठरवले असून, देशातील उत्पादन वाढण्याच्या अंदाजानंतर हा निर्णय घेण्यात आला आहे.

हरभरा उद्योगाच्या अपेक्षांना धक्का

हरभऱ्याच्या आयातीवरील नवीन शुल्क निश्चित करताना कृषी पायाभूत सुविधा उपकर लागू करण्यात आलेला नाही. सामान्यत: हा कर १०म असतो, परंतु यावेळी त्याला वगळण्यात आले आहे. सरकारच्या मते, आयात शुल्क तुलनेने कमी असून, त्याचा बाजारातील दरांवर मोठा परिणाम होणार नाही.



तथापि, हरभरा उद्योग आणि व्यापारी संघटनांनी सरकारच्या या निर्णयावर नाराजी व्यक्त केली आहे. त्यांचा आग्रह आहे की, आयात कमी करण्यासाठी किमान २५म शुल्क लावावे. इंडिया पल्सेस अँड ग्रेन्स असोसिएशनचे अध्यक्ष बिमल कोठारी म्हणाले, ''भारतात हरभऱ्याचे उत्पादन वाढत असूनही आयात सुरूच राहिल्यास, ऑस्ट्रेलियातील शेतकरी आगामी हंगामात मोठ्या प्रमाणात हरभऱ्याची लागवड करण्यास प्रवृत्त होतील.''

हरभऱ्याच्या उत्पादनात मोठी वाढ अपेक्षित

मागील हंगामात एल निनो प्रभावामुळे हवामान प्रतिकूल होते, परिणामी हरभऱ्याचे उत्पादन घटले होते. त्यामुळे मे २०२४ मध्ये केंद्र सरकारने हरभऱ्यावरील आयात शुल्क शून्य करण्याचा निर्णय घेतला. मात्र, २०२५ च्या खरीप हंगामात उत्पादनात मोठी वाढ अपेक्षित आहे. सरकारी अंदाजानुसार, जूनपर्यंत देशात १२.६१ दशलक्ष टन हरभऱ्याचे उत्पादन होईल, जे मागील वर्षीच्या ११.०४ दशलक्ष टनांपेक्षा अधिक आहे.

सरकारी आकडेवारीनुसार, एप्रिल २०२४ ते फेब्रुवारी २०२५ दरम्यान भारताने १.२५ दशलक्ष टन हरभरा आयात केला आहे. ही आयात प्रामुख्याने ऑस्ट्रेलिया आणि टांझानिया येथून झाली आहे. तुलनात्मक दृष्टिकोनातून, २०२३ मध्ये याच कालावधीत ही संख्या फक्त ०.१६ दशलक्ष टन होती. त्यामुळे पुढील हंगामात हरभरा उत्पादन वाढण्याची शक्यता असून, स्थानिक शेतकऱ्यांना त्याचा फायदा होईल.

शेतकऱ्यांच्या दृष्टीने हा निर्णय कितपत फायदेशीर?

देशभर हरभऱ्याच्या कापणीला सुरुवात झाली असून, सध्याची सरासरी बाजार किंमत ५,४६१ रुपये प्रति क्विंटल आहे. मात्र, सरकारने निश्चित केलेली किमान आधारभूत किंमत (श्एइ) ५,६५० रुपये प्रति क्विंटल आहे. विशेषत: मध्य प्रदेश आणि महाराष्ट्रातील बाजार समित्यांमध्ये दर श्एइ पेक्षा कमी असल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

आयात शुल्क लागू झाल्यानंतर हरभऱ्याच्या किमती स्थिर राहतील आणि भाव कमी होण्याची शक्यता टळेल, असा सरकारचा अंदाज आहे. रब्बी २०२५ हंगामासाठी सरकारने २७.९९ लाख टन हरभऱ्याची श्एइ वर खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे.

पिवळ्या वाटाण्याच्या आयात धोरणातही बदल

दुसरीकडे, पिवळ्या वाटाण्याच्या शुल्कमुक्त आयात कालावधीत वाढ करण्यात आली आहे. ही सुविधा आता ३१ मे २०२५ पर्यंत लागू असेल. डिसेंबर २०२३ मध्ये ही आयात माफ करण्यात आली होती आणि याचा उपयोग खाद्य उद्योग मोठ्या प्रमाणात करत आहे.

सरकारच्या या धोरणात्मक निर्णयांमुळे देशातील डाळीच्या बाजारपेठेवर लक्षणीय परिणाम होण्याची शक्यता आहे. हरभऱ्याच्या आयातीवर शुल्क वाढवले असले तरी, स्थानिक उत्पादन आणि शेतकऱ्यांना मिळणाऱ्या दरांवर त्याचा नेमका किती प्रभाव पडतो, हे येत्या काही महिन्यांत स्पष्ट होईल.

## संक्षिप्त...

### स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर काळी गुढी उभारत सरकारचा निषेध




दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शेतकऱ्यांना कर्जमाफी देता येणार नसल्याची केलेली वल्गना तसेच शक्तीपीठ महामार्गाच्या विरोधात आज स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने कोल्हापूर जिल्हाधिकारी कार्यालयावर गुढी पाडव्यादिवशी काळी गुढी उभारून सरकारचा निषेध करण्यात आला आहे. यावेळी कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी करत निदर्शने केली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शेतकऱ्यांना कर्जमाफी देता येणार नाही असं वक्तव्य करून ३१ मार्चच्या आत कर्ज भरून टाकण्याचा सल्ला दिला आहे. तर देवेंद्र फडणवीस यांनी अजित पवारांच्या वक्तव्याचं समर्थन करून स्वतःचे व सरकारचे अपयश दाखवून दिल्याचा आरोप आंदोलकांनी केलाय.

### मोदींनी महाराष्ट्राची मोठी निराशा केलेली आहे काँग्रेस प्रवक्ते अतुल लोंढे यांचा आरोप



दैनिक आपला विदर्भ


**मुंबई/प्रतिनिधी :** पंतप्रधान नरेंद्र मोदी आज नागपुरात आले होते.आम्ही त्यांचे स्वागत केले. पण नरेंद्र मोदी स्वतः दिलेलं आश्र्वासन विसरून गेले. एकनाथ शिंदे यांनी सांगितले होते की, टाटा एअर बस, वेदांता फॉक्सकॉन, इंटरनॅशनल फायनान्ससेंटर हे जे उद्योग गुजरात मध्ये महाराष्ट्रातले घेऊन गेले, त्याच्यापेक्षा मोठा उद्योग देणार होते. नरेंद्र मोदींनी भाषणबाजी केली. त्या भाषणातून खोटेपणा दाखवून दिला. ते म्हणाले की, आम्ही विदेशातून मोठमोठे रेस्क्यू ऑपरेशन केले. अमेरिकेतून लोकांच्या पायात साखळ्या आणि हातकड्या घालून आत्ताच लोक आले होते ना. छोट्या छोट्या देशांनी आपापले विमाने पाठवून आपल्या नागरिकांना सन्मानाने परत देशात आणलं होते. ते तुम्ही करू शकले नाही. ते आपले अपयश नाही आहे का? खोटं बोल रेटून बोल हा कार्यक्रम त्यांनी इथे सुद्धा चालू ठेवला. मोठी निराशा मोदींनी महाराष्ट्राची केलेली आहे. आले, भाषण दिले आणि गेले. अशाच पद्धतीचा हा दौरा होता. महाराष्ट्राला यातून काहीही भेटलेलं नाही.असा आरोप काँग्रेस प्रवक्ते अतुल लोंढे यांनी केला.

### जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वारावर स्वाभिमानी शेतकरी संघटनेने उभारली शेतमालाची गुढी



दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :** जालन्यात स्वाभिमानी शेतकरी संघटनेने आज शेतमालाची गुढी उभारली आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मुख्य प्रवेश द्वारावर ही गुढी उभारण्यात आली. मोसंबी, संत्रा, द्राक्ष, कापूस ,मक्याचं कणीस असा शेतमाल गुढीला बांधून ही गुढी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या गेटवर उभारुन राज्य सरकारचा निषेध नोंदवण्यात आला. या वेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी राज्य सरकार, मुख्यमंत्री तसेच दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्या विरोधात घोषणाबाजी करून शेतकऱ्यांची कर्जमुक्त करण्याची मागणी केली. दरम्यान, अजित पवार यांनी कर्जमाफी बद्दल वक्तव्य केलंय, त्यामुळे यापुढे सरकार विरोधात रस्त्यावरची लढाई लढण्याचा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेने दिला आहे.



## विविध वृत्त...

### घरगुती वादातून पुतण्याने केली काकाची कुऱ्हाडीने हत्या

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलडाणा /प्रतिनिधी :** घरगुती वादातून पुतण्याने काकाची कुऱ्हाडीने वार करून हत्या केल्याची घटना नांदुरा तालुक्यातील सोनस येथे २९ मार्च रोजी घडली. गोपाळ बोके आणि पुतण्या शुभम बोके यांच्यात घरगूती कारणावरून मोठा वाद झाला होता.वादाने रूपांतर हाणामारी मध्ये झाले त्यात पुतण्या गोपाळ बोके याने धारदार शास्त्राने काका गोपाळ ओके यांच्यावर कुऱ्हाडीने प्राणघातक हल्ला केला. त्यात काकाचा मृत्यू झाल्याची घटना शनिवारी सायंकाळी घडली. पोलिसांनी शुभमला आज अटक करत त्याच्या विरोधात खुनाचा गुन्हा दाखल केला आहे. विशेष म्हणजे कालच आरोपी शुभम बोके विरोधात अश्रिलल शिविगाळ व जीवे मारण्याची धमकी देत असल्याबाबत मृतक गोपाळ बोके यांनी नांदुरा पोलिसात तक्रार नोंदवली होती. मात्र, त्या तक्रारींवर कुठलीच कारवाई झाली नाही. जर त्या तक्रारी ची पोलिसांनी वेळीच दखल घेतली असती तर, हत्या झाली नसती असा आरोप नातेवाईकांनी केला आहे.

### जनता सरकारला धडा शिकवल्याशिवाय राहणार नाही; शिवसेना जिल्हाप्रमुख शिवसेना जिल्हाप्रमुख जालिंधर बुधवत यांची विरोधकांवर टीका

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलडाणा /प्रतिनिधी :** निवडणूक काळात विविध प्रकारचे गाजर दाखवत सत्ता हस्तगत केली आता मात्र शेतकऱ्यांना कर्जमाफी देणे टाळले जात आहे



जनता सरकारला धडा शिकवल्याशिवाय राहणार नाही असे मत शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख जालिंधर बुधवत यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

लाडकी बहिण योजेच्या बहिणींनी सरकारला सत्तेत आणले. यांना आता संपूर्ण लाडक्या बहिणीचा लाभच बंद करायचा आहे. निवडणुकीच्या वेळी भूलथापा दिल्या.लाडक्या बहिणीसह इतर योजना आता बंद करायच्या आणि पुन्हा निवडणूक आल्या की नवीन फंडे आणायचे आणि आश्र्वासने द्यायची.मात्र, येणाऱ्या काळात जनता महायुती सरकारला धडा शिकवल्याशिवाय राहणारा नाही. अजित पवार, कर्जमाफी करता येणार नाही.अजित पवार म्हणतात की, आता तीन वर्ष कर्ज माफी करता येणार नाही. मात्र, त्यानंतर निवडणुकीच्यावेळी पुन्हा गाजर दाखवण्याची घोषणा करायची, ते सत्तेत यायचा पुन्हा घाट घालत आहेत. सोयाबीन सह कोणत्याच मालाला भाव नाही.शेतकरी अत्यंत दयनीय अवस्थेत असून ते म्हणता की बँकेचे कर्ज भरा. मग हे बँकेचे अधिकारी झाले की काय असा प्रश्र्न पडला. ही निवडणूक त्यांनी आश्र्वासन देऊन जिंकली. मात्र, येणाऱ्या काळात जनता धडा शिकवल्याशिवाय राहणार नाही. असे मत शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख जालिंधर बुधवत यांनी व्यक्त केले.

### सलमान खानचा 'सिकंदर' पहिल्याच दिवशी ऑनलाइन लीक; निर्मात्यांना मोठा धक्का

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** सलमान खानचा बहुप्रतीक्षित 'सिकंदर' चित्रपट आज ( ३० मार्च ) ईदच्या निमित्ताने सर्वत्र प्रदर्शित झाला. 'टायगर ३' नंतर जवळपास दीड वर्षांनी बॉलीवूडचा भाईजान या सिनेमाच्या निमित्ताने रुपेरी पडद्यावर पुनरागमन करण्यासाठी सज्ज झाला आहे. यामुळे सर्व चाहत्यांच्या मनात या सिनेमाबद्दल प्रचंड उत्सुकता होती. मात्र, 'सिकंदर' सिनेमा प्रदर्शित झाल्यावर पहिल्याच दिवशी निर्मात्यांना मोठा फटका बसला आहे.

सलमान खानचा सिनेमा ऑनलाइन लीक झाला आहे. थिएटरमध्ये प्रदर्शित झाल्यावर पहिल्याच 'सिकंदर' लीक झाल्याने या सिनेमाच्या बॉक्स ऑफिस कलेक्शनवर परिणाम होण्याची शक्यता आहे.

सलमान खान आणि रश्मिका मंदान्ना यांचा 'सिकंदर' हा चित्रपट पहिल्याच दिवशी एचडी क्वालिटीमध्ये ऑनलाइन लीक झाला आहे. हा चित्रपट तमिळरॉकर्स, मुव्हीरुल्झ, फिल्मीझिला आणि टेलिग्राम ग्रुप सारख्या प्लॅटफॉर्मवर मोफत पाहण्यासाठी उपलब्ध आहे. या वेबसाइट्सवर चित्रपटाच्या बेकायदेशीर स्ट्रीमिंग लिंक्स व्हायरल करण्यात आल्या आहेत. यामुळे सिनेमाच्या बॉक्स ऑफिस कलेक्शनवर देखील परिणाम होणार आहे.

सरकार बेकायदेशीर स्ट्रीमिंग प्लॅटफॉर्म्सवर सतत कारवाई करत असूनही, चित्रपट प्रदर्शनाआधी किंवा पहिल्याच दिवशी लीक होणं ही एक निर्मात्यांकरता मोठी समस्या निर्माण झाली आहे. सिकंदर कॅमकॉर्डर रेकॉर्डिंगमधून लीक झाला असावा आणि त्यानंतर काही तासांतच एचडी गुणवत्तेत अपलोड करण्यात आला दावा करण्यात येत आहे.

# अधिकाऱ्याकडून दिशाभूल देणारी माहिती, आमदार संतापले : आमसभेत अधिकाऱ्यांना धरले धारेवर

**दैनिक आपला विदर्भ**

**मेहकर/प्रतिनिधी : तालुक्याची आमसभा तब्बल सात वर्षानंतर २९ मार्च रोजी घेण्यात आली. या सभे तालुक्यातील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले प्रश्र्न शेतकऱ्यांनी पोटतिडकिने मांडून आपली व्यथा आम सभेतील केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव आमदार सिद्धार्थ खरात यांच्यासह इतर माजी पदाधिकारी व अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत मांडली. यावर आमदार सिद्धार्थ खरात यांनी अधिकाऱ्यांना जाब विचारला असता, अधिकाऱ्यांनी चक्क केंद्रीय मंत्री व आमदारासमोरच दिशाभूल करणारी माहिती देत आमदाराची दिशाभूल केली. त्यामुळे आमदार चांगलेच संतापले व अधिकाऱ्यांची खरडपट्टी काढली. मात्र, अधिकारी भरआम सभेत केंद्रीय मंत्री आमदारांसमोर दिशाभूल करणारी माहिती देतात. तर, सामान्य जनतेचे काय हाल असतील हे मात्र न विचारलेलेच बरे, अशा प्रतिक्रिया अधिकाऱ्यांच्या या दिशाभूल करणाऱ्या माहितीवरून उमटत आहेत.**




मेहकर तालुक्याचे आमसभा तब्बल सात वर्षांच २९ मार्च रोजी घेण्यात आली.या आमसभेला केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव, आमदार सिद्धार्थ खरात यासह इतर पदाधिकारी व प्रमुख अधिकाऱ्यांची उपस्थिती होती. यावेळी नागरिकांनी आपल्या समस्या मांडून त्या निकाली काढण्याची मागणी केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव व आमदार सिद्धार्थ खरात यांच्याकडे केली.

या मागणीवर आमदारांनी अधिकाऱ्यांना प्रश्र्न विचारत सदर समस्याबाबत विचारणा केली असता, अधिकाऱ्यांनी चक्क आमसभेतच केंद्रीय मंत्री व आमदार यांच्यासमोर दिशाभूल करणारी माहिती देत ज्या ठिकाणचे जल जीवन मिशन योजना सुरू नाही, सहा योजना सुरू असल्याचे माहिती भर आमसभेत दिली. तर, उपस्थित नागरिकांनी जलजीवन मिशन योजनेची कोणतेही काम गावात पूर्ण झाले नाही. गावात जलजीवन मिशन योजनेत अंतर्गत पाणीपुरवठा होत नाही,अशी माहितीच अधिकाऱ्यांच्या तोंडावर दिली. त्यामुळे कामचुकार अधिकाऱ्यांची भरआमसभेत पोलखोल झाल्याने अधिकाऱ्यांची एकच त्रेधातिरपट यावेळी आमदार सिद्धार्थ खरात यांनी आक्रमक पवित्रा घेत अधिकाऱ्यांना चांगलेच झाल्यावर धरले संतापलेले आमदार पाहून अधिकाऱ्यांचीही बोबडी वळाल्याचे चित्र आम सभेत दिसून आले. आमदारा समोर किंवा केंद्रीय मंत्र्यांसमोर अधिकारी जे काम झाले नाही ते काम पूर्ण झाले असल्याचे छातीठोकपणे सांगेत दिशाभूल करीत असल्याने व जनतेने हे कोणतेही काम झाले नसल्याचे सांगून अधिकाऱ्यांची पोलखोल केल्याने जलजीवन मिशन योजनेअंतर्गतचा सावळा गोंधळ चव्हाट्यावर आला आहे. तालुक्यात ९२ ठिकाणी जलजीवन मिशन योजनेचे कामे सुरू असून यातील केवळ सहा कामे पूर्ण झाले असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले आहे. मात्र, नागरिकांनी हे सहा कामेही पूर्ण नसल्याचे सांगून जल जीवन मिशन योजनेचा गोंधळ चव्हाट्यावर आणला आहे. अधिकाऱ्यांच्या या मुजोरी बाबत आता संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई होणार का याकडे जनतेचे लक्ष लागले आहे..

## अविनाश जाधव यांच्या फोटोला मनसेच्या कार्यकर्त्यांनीच काळे फासले, पालघरमधील वाद चव्हाट्यावर

**मुंबई/प्रतिनिधी :** एकीकडे मनसेच्या गुढीपाडवा मेळाव्याची जोरदार तयारी सुरू असताना दुसरीकडे पालघरमधील मनसेतील अंतर्गत वाद पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. मनसैनिकांना गुढीपाडवा मेळाव्यासाठी आवाहन करणाऱ्या बॅनरवरील म नसे नेते अविनाश जाधव यांच्या फोटोला काळ फासण्यात आलं आहे. पालघरच्या बोईसर मधील ओसवाल परिसरात लागलेल्या बॅनरवरील फोटोला हे काळं फासण्यात आलं आहे. विशेष म्हणजे काही मनसे पदाधिकाऱ्यांनीच हे काळं फासल्याची माहिती समोर येत आहे.

विधानसभेनंतर पालघर मनसेत वाद

विधानसभा निवडणुकीनंतर पालघर मनसेम धील वाद चव्हाट्यावर आला होता. पालघरची जबाबदारी अविनाश जाधव यांच्याकडे होती. पण त्यांनी त्यांचं काम व्यवस्थित केलं नसल्याचा आरोप करत पालघरच्या कार्यकर्त्यांनी राज ठाकरे यांची भेट घेतली होती. त्यानंतर पालघरचे मनसे जिल्हाध्यक्ष समीर मोरे यांना जबर मारहाण करत त्यांचे बंधू आतिश मोरे यांच्यावर पंधरा ते वीस मद्यधुंद अवस्थेत असलेल्या गावगुंडानी धारदार शस्त्राने जीवघेणा हल्ला केला होता. या हल्ल्यामागे अविनाश जाधव हेच असल्याचा समीर मोरे यांच्या कुटुंबीयांकडून करण्यात आला होता.

मनसे नेते अविनाश जाधव यांनी निवडणूक काळात दिलेली जबाबदारी पार पाडली नसल्याची तक्रार राज ठाकरे यांच्याकडे केल्यानंतर राज ठाकरे यांनी अविनाश जाधव यांची कानउघाडणी केली. नेमका हाच राग मनात धरून अविनाश जाधव यांनी हा हल्ला केल्याचं मोरे यांच्या सहकाऱ्यांकडून सांगण्यात आलं होतं. त्यामुळेच अविनाश जाधव यांच्या नावाला पालघरमधील काही कार्यकर्त्यांनी विरोध केला आहे. मनसेच्या मेळावा बॅनरवर अविनाश जाधव यांच्यासह अनेक पदाधिकाऱ्यांचे फोटो आहेत. पण फक्त अविनाश जाधव यांच्याच फोटोला काळं फासण्यात आलं आहे.

## बीडमधील मशिदीत स्फोट कसा घडला? आरोपींकडून खतरनाक पदार्थाचा वापर, पोलिसांची धक्कादायक माहिती!

**दैनिक आपला विदर्भ**

**बीड/प्रतिनिधी :** ईदच्या तोंडावर बीडच्या गेवराई तालुक्यातील अर्धाम सला गावात एका मशिदीमध्ये स्फोट करण्यात आल्याची धक्कादायक माहिती समोर आली होती. यात स्फोटामुळे मशीदीमधील फरशी आणि बांधकाम ला तडे गेले आहेत. मध्यरात्री अडीच वाजण्याच्या सुमारास माथे फिरूने हे कृत्य केल्याची माहिती आहे. या प्रकरणानंतर पोलिसांनी तातडीने धाव घेतली अन् प्रकरण नियंत्रणात आणलं आहे. बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी नागरिकांना शांततेचं आवाहन केलं आहे.

जिलेटिन वापरून ब्लास्ट

आरोपीने मज्जिद मध्ये जाऊन जिलेटिन वापरून ब्लास्ट केला. सरपंचांनी आम्हाला माहिती देतात वीस मिनिटांमध्ये घटनास्थळी पोहोचलो. सहा वाजता आम्ही दोन्ही आरोपींना अटक केला आहे. सर्वांनी शांततेत राहावं, असं आवाहन बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी केले आहे. मात्र, बीडमध्ये जिलेटिन कुठून आलं? जिलेटिनचा वापर करण्यात आल्याने आता पोलीस यंत्रणा देखील सतर्क झाली आहे.

आरोपी ताब्यात, शांततेचं आवाहन

ब्लास्ट प्रकरणात फिर्यादीनुसार तलवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोन आरोपींना ताब्यात घेतलं आहेत. गावामध्ये शांतता आहे. बीड जिल्ह्यातील सर्व लोकांना आव्हान आहे की शांत राहावं. झालेली घटना अत्यंत निंदनीय आहे, पण पोलीस तत्पर आहे. लगेच पोलिसांनी येऊन दोन तीन तासांमध्ये आरोपींना पकडले आहे आम्ही आमच्या शंभर टक्के काम केले आहे. लोकांनी शांततेत राहावे. दोन्ही सण शांततेत सादरी करावेत, असं आवाहन देखील एसपी नवनीत कावत यांनी केलं आहे.

किरकोळ झालेला वादामधून आरोपींचं कृत्य

दरम्यान, उरूस मिरवणुकीत किरकोळ झालेला वादामधून आरोपींनी दारूच्या नशेमध्ये असे कृत्य केल्याची प्राथमिक माहिती आहे. गाव शांत आहे. घटनेनंतर मज्जित साफ केली आहे गावातील सगळे लोक एकत्रित राहत आहोत. कुठलाही अफवांवर विश्वास ठेवू नका, असं आवाहन गावातील मुस्लिम बांधवांनी केलं आहे.

## भामरागडमध्ये पुन्हा नक्षलवाद्यांकडून आदिवासीची हत्या

**दैनिक आपला विदर्भ**

**गडचिरोली/प्रतिनिधी :** भामरागड तालुक्यातील जुवी या अतिदुर्गम गावात नक्षलवाद्यांनी एका निरपराध आदिवासी वृद्धाची २९ मार्च रोजी मध्यरात्री गळा दाबून हत्या केली. ३० मार्च रोजी गुढीपाडव्याच्या सकाळी ही घटना उजेडात आली. पुसू गिबा पुंगाटी (६०) असे हत्या झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. दोन महिन्यांत नक्षल्यांनी दोन हत्या केल्याने भामरागडमध्ये पुन्हा एकदा नक्षल्यांच्या हालचाली वाढल्या आहेत.

पोलिसांच्या माहितीनुसार, २९ रोजी रात्री पुसू पुंगाटी कुटुंबासह घरी होते. मध्यरात्रीच्या सुमारास चार नक्षलवाद्यांनी घराच्या दरवाजावर थाप मारली. कुटुंबीयांनी दरवाजा उघडला असता पुसू यांच्याकडे काम आहे असे सांगून त्यांना ते सोबत घेऊन गेले. गावालगतच्या जंगलात पुसू पुंगाटी यांची गळा दाबून हत्या करण्यात आली. ३० रोजी सकाळी त्यांचा मृतदेह आढळून आला. घटनास्थळी नक्षल पत्रक किंवा पोस्टर आढळून आले नाही. त्यांचा मृतदेह भामरागड येथील रुग्णालयात आणण्यात आला आहे. पोलिसांचा खबरी असल्याचा संशयातून ही हत्या केली असावी, असा संशय व्यक्त केला जात आहे. पोलिसांनी ते खबरी असल्याचा दावा फ ेटाळून लावला आहे. परिसरात नक्षलविरोधी अभियान तीव्र करण्यात आले असून अधिक तपास सुरू आहे, असे पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांनी सांगितले.

महिनाभरापूर्वी माजी सभापतींची हत्या

१ फेब्रुवारीला भामरागडचे माजी पंचायत समिती सभापती सुखराम मडावी (रा. कियर) यांची हत्या करून नक्षल्यांनी मृतदेहाजवळ पत्रक टाकले होते. दोन महिन्यांत दुसरा खून झाल्याने या भागात नक्षली सक्रिय झाल्याचे चित्र दिसून येत आहे. छत्तीसगड सीमेवरून गडचिरोलीत प्रवेश करणाऱ्या माओवाद्यांची पोलिसांनी सीमावर्ती भागात पोलिस ठाणे सुरू करून कोंडी केली आहे. चालू वर्षी भामरागड तालुक्यात छत्तीसगड सीमेवर पेनगुंडा, नेलगुंडा व कवंडे येथे पोलीस ठाणे सुरू करण्यात आले आहे. त्यामुळे नक्षलवादी बिथरले आहेत.

## आता शिर्डीप्रमाणेच त्र्यंबकेश्वर मंदिरात मिळणार बुंदीच्या लाडूचा प्रसाद; देवस्थान ट्रस्टचा निर्णय, गुढी पाडव्याच्या मुहूर्तावर सुरुवात

**मुंबई/प्रतिनिधी :** बारा ज्योतिर्लिंगापैकी एक असणाऱ्या त्र्यंबकेश्वर मंदिरात आता भाविकांना बुंदीच्या लाडूचा प्रसाद मिळणार आहे. गुढी पाडव्याचे औचित्य साधून आजपासून देवस्थान ट्रस्टच्या माध्यमातून प्रसादाच्या लाडू वाटपास सुरुवात करण्यात आली आहे. देवस्थान ट्रस्टच्या निर्णयाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. तिरुपती बालाजी, पंढरपूर, शिर्डी संस्थानप्रमाणे आता त्र्यंबकेश्वरमध्ये देखील भाविकांना प्रसादाचे बुंदीचे लाडू मिळणार आहेत. अल्प दारात भाविकांसाठी प्रसादाचे लाडू उपलब्ध करण्यात आले आहेत. आज पासून लाडू वाटपास सुरुवात करण्यात आली असून देवस्थान ट्रस्टच्या निर्णयाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे पाहायला मिळत आहे. अवघ्या १० ते १५ मिनिटात लाडूचे तब्बल ५०० बॉक्स संपल्याचे दिसून आले.

## कर्जमुक्ती हा आमचा नैतिक अधिकार आहे ; रविकांत तुपकर सत्ताधाऱ्यांवर बरसले

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलडाणा /प्रतिनिधी :** कर्जमुक्ती हा आमचा नैतिक अधिकार आहे. आमच्या शेतमालाला भाव द्या आणि तुमच्या योजना चुलीत घाला असे परखड मत व्यक्त करत शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी सत्ताधाऱ्यांनी शेतकऱ्यांना कर्ज माफी देण्याची मागणी केली.

माध्यमांशी बोलताना शेतकरी नेते रविकांत तुपकर म्हणाले की, शेतकरी कर्जमाफी किंवा कर्जमुक्ती का मागतोय? हे समजून घेणे खुप महत्त्वाचे आहे.शेतकऱ्याला आरोपीच्या पिंजऱ्यात उभं करणे योग्य नाही. अनेक उद्योगपतींचे उद्योग तोट्यात जातात. राष्ट्रीय पातळीवरच्या तेव्हा त्यांच्या राईट ऑफ नावाखाली कर्ज माफ केले जाते. हजार कोटींचे कर्ज माफ केले जाते. कारण त्यांचा उद्योग तोट्यात जातात. आमचा शेती व्यवसाय सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे तोट्यात आहे. सोयाबीनला भाव नाही, कापसाला भाव नाही, गेल्या तीन वर्षापासून भाव पडल्यामुळे शेतकऱ्यांच्या घरात सोयाबीन-कापूस पडून आहे. कोणत्याही शेतमालाला भाव नाही. त्याच्यामुळे आमच्यावर कर्ज झालेले आहेत. म्हणून कर्जमुक्ती हा आमचा नैतिक अधिकार आहे.

सरकारनेच काय सगळ्या पक्षांनी सांगितले होते की, आम्ही कर्जमुक्ती करू. आता जे सरकार सत्य झालं त्यांनी दिलेला शब्द पाळावा. ही माफक अपेक्षा आहे. सरकारने एखादा प्रोजेक्ट कमी करावा, शक्तीपीठ महामार्ग दोन वर्ष उशिरा करावा, अजून एखादा प्रोजेक्ट उशिरा करावा, अत्यावश्यक गोष्ट अशी की शेतकऱ्यांना जगवणे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवणे. त्याच्यासाठी शेतकऱ्यांना कर्जमुक्ती करणे खूप आवश्यक आहे. इतर योजनांचया माध्यमातून आम्हाला भिकारी बनवता ते करण्यापेक्षा सोयाबीन,



कापसाला शेतमालाला चांगला भाव द्या. तुमच्या त्या योजना चुलीत घाला. आम्हाला शेतमालाला चांगला भाव द्या आम्ही आयुष्यात तुमच्या दारात भीक मागायला येणार नाही. असे परखड मत शेतकरी नेते रविकांत उपकर यांनी व्यक्त केले.